



०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


जा.क्र. ४२७ /जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र, पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा दिनांक. १३/०८/२०१८

## फिरत्या पोलीस स्टेशनला जनतेचा प्रतिसाद वाढला शेतीच्या हंगामातही फिरत्या पोलीस स्टेशनला जनतेची उपस्थिती

**भंडारा:–** जिल्हयात मा. पोलीस अधीक्षक श्रीमती विनीता साहू यांचे मार्गदर्शनात दिनांक ११/०८/२०१८ रोजी जिल्हयात ठिकठिकाणी फिरते पोलीस स्टेशन कॅम्प लावण्यात आले होते. यामध्ये पोलीस स्टेशन लाखनी अंतर्गत ग्राम सालेभाटा येथे दिनांक १०/०८/२०१८ रोज शुक्रवारला ला फिरते पोलीस स्टेशन कॅम्प व अंधश्रध्दा निर्मुलन कार्यक्रम घेण्यात आले. ग्राम सालेभाटा येथे घेण्यात आलेल्या कॅम्पमध्ये पोलीस निरीक्षक, मंडलवार, ठाणेदार पोलीस स्टेशन लाखनी व त्याचे सहकारी अधिकारी, कर्मचारी यांनी ग्राम सालेभाटा येथे फिरते पोलीस स्टेशन दरम्यान श्रीमती बेबी उत्तम टेभुर्णे वय ४८ वर्ष रा. सालेभाटा यांनी गैरअर्जदार १) संजय सुरदास टेभुर्णे वय अंदाजे ४० वर्ष रा. सालेभाटा २) कमलदास सुरदास टेभुर्णे वय अंदाजे ६० वर्ष रा. सालेभाटा यांचेविरुध्द घराचे जागेवरुन वाद असल्याची तक्रार केली होती. ४९८/१८ प्रमाणे ५०४,५०६, प्रमाणे एन. सी. देण्यात आली. जनतेस गावातील छोटे तंटे गावातचे निपटारा होण्या बाबत तसेच प्रतिसाद, पोलीस मित्र ॲप्स, महिला विषयक कायदे, तसेच घरफोडी, पोलीस मित्र ॲप्स, तसेच घरफोडी, व चोरी होवु नये व बॅकींग फसवणुक बाबत वाहन ध्वनी प्रदुषण, गावदारुबंदी करणे बाबत चर्चा व मार्गदर्शन करण्यात आले. किडणी चोर अफवा, ब्लुवेलगेम माहिती देण्यात आली. तसेच संत गाडगे विचारक व अंधश्रध्दा निमुर्लन समिती अमरावती येथील प्रबोधनकार श्री. श्रीकृष्ण धोटे यांनी जादुटोना कायदा व समाजात अंधश्रध्दे मुळे होणारे वाईट परिणाम होवुन भोंदु बाबा लोकांना कसे फसवितात. याबाबत लोकांना मार्गदर्शन केले. तेथे ८० स्त्री, पुरुष उपस्थित होते. पोलीस स्टेशन साकोली अंतर्गत बिर्सी येथे फिरते पोलीस स्टेशनचे आयोजन करण्यात आले. तेथे अंधश्रध्दा व जादुटोना निमुर्लन प्रचारक यांनी जादुटोना विरोधी कायदयाचे मार्गदर्शन करण्यात आले. चोरी, घरफोडी, महिलावर होणारे अत्याचार बाबत मार्गदर्शन केले. त्यामध्ये ३०० शाळकरी विदयार्थी, विदयार्थीनी व गावकरी हजर होते. पोलीस स्टेशन तुमसर अंतर्गत ग्राम डोंगरला येथे फिरते पोलीस स्टेशन चे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये सपोनि. झोंटींग व ४ कर्म यांनी फिरते पोलीस स्टेशन बाबत माहिती दिली. ऑनलाईन फसवणुक, प्रतिसाद ॲप्स, एटीएम फसवणुक बाबत तसेच अफवावर विश्वास ठेवु नये याविषयी खबर देण्याची माहिती दिली. येथे ४० जनसमुदाय हजर होते. पोलीस स्टेशन पवनी अंतर्गत खैरी दिवान येथे फिरते पोलीस स्टेशन चे आयोजन करण्यात आले. पोलीस स्टेशन ठाणेदार पोनि. चकाटे व ३ कर्म व २ सैनीक हजर होते. लैगिंक अत्याचार बाबत अल्पवयीन मुले, मुली पळुन जावु नये. फ्रॉड कॉल येतात त्याना आपण आपली वैयक्तीक माहिती देवु नये आधार नं. कोणालाही देवु नये. इ. बाबत माहिती दिली. त्यामध्ये ६० स्त्री पुरुष उपस्थित होते. पोलीस स्टेशन स्टेशन गोबरवाही अंतर्गत येदरबुची येथे फिरते पोलीस स्टेशनचे ठाणेदार सपोनि. म्हसकर, तसेच ३ कर्म २ सैनीक यांनी गावातील लोकांना अंधश्रध्दा निमुर्लना बाबत बॅकींग फ्रॉड, गावात कोणी अनोळखी इसम आल्यास त्वरीत पोस्टेला माहीती देणे, बाल लैगिंक अत्याचार बाबत, युवा पिडीला स्पर्धा परिक्षेबाबत माहीती दिली. गावातील उपस्थित जनसमुदाय ४० हजर होते. पोलीस स्टेशन दिघोरी अंतर्गत जैतपुर येथे फिरते पोलीस स्टेशन घेण्यात आले. पोलीस स्टेशनचे ठाणेदार पोनी. गांवडे व २ कर्म यांनी फिरते पोलीस स्टेशन घेवुन अंधश्रध्दा मा. श्रीकृष्ण धोटे जि. अमरावती यांनी अंधश्रध्दा तसेच समाजातील अनिष्ठ अघोरी व वाईट रितीवर मार्गदर्शन करुन समाजातील भोंदुबाबा गरीब अज्ञात भोळया, भांबळया लोकांना कसे फसवतात या बाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन करुन त्याचप्रकारचे वैज्ञानीक दृष्टीकोनातुन प्रयोग करुन दाखविले. तसेच फिरते

पोलीस स्टेशन दरम्यान पोनी. गांवडे यांनी ग्रामस्थांना मोलाचे मार्गदर्शन केले. पोलीस स्टेशन मोहाडी अंतर्गत ग्राम हरदोली येथे फिरते पोलीस स्टेशन येथे पोउपनि. थेरे व २ कर्म यांनी बॅकेचे अॅकाऊंन्ट नं. एटीएम कार्ड नं. कोणत्याही अनोळखी व्यक्तीस देवु नये. अनोळखी व्यक्तीचे फोन आल्यास माहीती सांगु नये संशयीत व्यक्ती फरीवाले, गावात आढळल्यास त्यानां चांर समजुन मारहान न करता पोस्टेला माहीती दयावी. अंधश्रध्दा व जादुटोन्याला बळी पडू नये, गावात वाद निर्माण हात असेल अश्या व्यक्तीला समजावुन त्याला त्वरीत पोस्टेला घेवुन यावे. गावातील ६० नागरिक हजर होती. पोलीस स्टेशन आंधळगाव अंतर्गत शिवनी येथे फिरते पोलीस स्टेशनला पोउपनि. म्हैसकर व ४ कर्म यांनी महिला विषयक कायदे, मोटार वाहन कायदे, बॅकींग बाबत होणारी फसवणुक, एटीएम कार्ड बाबत सुरक्षा, घरफोडी, चोरी, अंधश्रध्दा निर्मलना, सडक सुरक्षा बाबत चर्चा करुन मार्गदर्शन केले. त्यामध्ये स्त्री पुरुष ४५ हजर होते. पोलीस स्टेशन अडयाळ अंतर्गत सेन्द्री बुज येथे पोउपनि. गायकवाड २ कर्म २ सै. यांनी मुलीचे अपहरण, बॅक एटीएम फ्रॉड, ऑनलाईन फसवणुक गावात येणारे मुसाफिर व चोरापासुन सावध राहण्याचे मार्गदर्शन केले. त्यामध्ये ७० जनसमुदाय उपस्थित होते. पोलीस स्टेशन वरठी अंतर्गत दाभा येथे बाल लैगिंक अत्याचार, सायबर क्राईम बाबत माहीती दिली. त्याचप्रमाणे पोलीस स्टेशन भंडारा अंतर्गत येथे हत्तीडोई येथे बॅकींग फसवणुक, बाल लैगिंक अत्याचार बाबत माहीती देण्यात आली.

एकुणच पोलीस अधीक्षक श्रीमती विनीता साहू यांच्या संकल्पनेतुन राबविण्यात येत असलेल्या फिरत्या पोलीस स्टेशन उपक्रमाचे फायदे जनतेच्या लक्षात येत असल्याने रोहणीचा व शेतातील ईतर महत्वाचे कामांचा हंगाम सुरू असुनही लोक मोठया प्रमाणावर फिरत्या पोलीस स्टेशनला हजर राहुन जनतेकडून मोठया प्रमाणावर हजर राहून चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे दिसुन येत आहे. लोक त्याचे तक्रारींचे निवारण करून घेत आहेत. तसेच पोलीसांकडुन मिळणा–या वेगवेगळया सुचनांची माहीती घेत आहेत. त्यामुळे पोलीस व जनता यांच्यामध्ये विश्वासाचे नाते निर्माण होत असुन जिल्हयामध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधीत असल्याचे चित्र दिसत आहे. अधिकाधिक लोकांनी फिरते पोलीस स्टेशन उपक्रमात सहभागी होवुन आपल्या समस्या व तक्रारी सोडवणुन घ्याव्यात विनाकारण न्यायालयापर्यंत नेवु नये आपल्या वेळेची व पैशाची बचत करावी व गावामध्ये शांततेचे व विकासाचे वातावरण निर्माण करावे असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीमती विनीता साहू यांनी जिल्हा वासीयांना केले.

(जितेद्रं के आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.